# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक २५/०९/२०२४ (बुधवार) दुपार

---

### अकस्मात मृत्यु

पोस्टे मौदा अंतर्गत मौजा एन.टी.पी.सी कंपनी मौदा येथे दि. २४/०९/२०२४ चे ०९.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— मुकेश विठ्ठल मोटघरे वय ३१ रा. मस्कासाथ संभाजी कसा राममंदिरच्या मागे नागपुर आणि मृतक नामे— सुरेश वसंतराव डोंगरे वय अंदाजे ५० रा. कुंभारी ता. मौदा जि. नागपूर यांची एन.टी.पी.सी कंपनी येथे सकाळी ०७.०० वा ते ०२.०० वा. पावेतो डयुटी सुरू असताना फिर्यादी हा बॉयलर सेक्शनमध्ये बॉयलरवर ०७ वा माळयावर ३५ मीटरवर पाईपद्वारे हवा मारून बॉयलरची धुळ साफ करीत होता. मृतक हा सफाईचे पाईप कुठे अडकू नये कामात फिर्यादीला मदत करीत असताना सुमारे ०९.३० वा. दरम्यान मृतक हा बॉयलरचे ३५ मीटरवर अंतरावरून २१ मीटर अंतरावर ०४ थ्या माळयावर अचानक खाली पडुन जखमी झाला. त्याला उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल नागपूर येथे भर्ती केले असता उपचारा दरम्यान मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे मौदा येथे मर्ग क्र. ६३/२४ कलम १९४ बी.एन.एस.एस अन्वये नोंद केला आहे. पुढील तपास मौदा पोलीस करीत आहे.

### पोस्टे सावनेर हद्दीत सट्टापट्टी लिहणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई

दिनांक २४/०९/२०२४ रोजी पोस्टे सावनेर येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, आरोपी १) प्रवीण राजेन्द्र नानवटकर, रा. चिचपुरा सावनेर हा सार्वजनिक ठिकाणी लोकांकडुन पैसे घेवुन वरली मटक्याचे आकडे लिहुन हारजितचा सट्टापट्टीचा जुगार खेळवत आहे. अशा माहिती वरून रेड केली असता वरली मटका सट्टापट्टी चालविणारा प्रवीण राजेन्द्र नानवटकर याचे ताब्यातून १) विवो कंपनीचा मोबाईल किंमती ८०००/— रूपये २) वरली मटक्याचे आकडे लिहलेले कागद, खजाना राजधानीचे आकडे लिहलेले कागद ३) एक पेन कीमती ३ रूपये ४) नगदी ७८० रूपये असा एकुण ८७८३/— रू चा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करून आरोपी क्र. ०१) यास अधिक विचारपुस केली असता त्याने सदरचा हारजितचा सट्टापट्टीचा जुगार खेळ हा २) फरार आरोपी शुभम बन्सोड दोन्ही रा. चिचपुरा सावनेर याचे सांगण्यावरून खळवतो असे सांगितले. आरोपीतांविरूद्ध कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम सहकलम ४९ बि.एन.एस अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे सावनेर येथील ठाणेदार पोनि उमेश पाटील, पोउपनि अरूण राठोड, पोशि भावेश शेंडे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर